# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- नागपूर शहरबस सेवेत विविध प्रकारच्या सवलती देण्यात येतात.
**{ सविवि }** जसे-विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, दिव्यांग, दुर्धर आजार व मनपा शाळेतील विद्यार्थी इत्यादी परिवहन विभागास सवलतीच्या रकमेची पूर्तता होत नसल्याने परिवहन विभागास दरवर्षी मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

दरवर्षी नागपूर शहरबस सेवेत मनपा शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागातर्फे विविध शालेय कार्यक्रम, सहल, क्रिडा स्पर्धा व शासनाचे सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी करिता मुलांना ने-आण करण्याकरिता 100 टक्के मोफत पास सवलत देण्यात येते. परिवहन विभागास दरवर्षी मोठ्या प्रमाणात येणाऱ्या आर्थिक भुर्दंड कमी करण्याच्या दृष्टीकोनातून मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे अध्यक्षतेखाली सन 2025-2026 या आर्थिक वर्षाकरिता महिला व बाल कल्याण योजनेच्या आराखड्याची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना मनपा शहरबस वाहतुकमध्ये नि:शुल्क प्रवास उपलब्ध करुन देण्याकरिता परिवहन विभागास प्रतिपूर्ती सन 2024-2025 मध्ये आलेला खर्च सन 2025-2026 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार महिला व बाल कल्याण पदांतर्गत करण्याकरिता मान्यता प्रदान केली आहे व सन 2025-2026 या आर्थिक वर्षातील प्रतिपूर्ती करावयाची रक्कम आर्थिक वर्षाच्या शेवटी निश्चित होईल त्यामुळे त्यासंदर्भात रक्कम वर्ग करण्यास पुढील आर्थिक वर्षात स्वतंत्र ठराव करण्याचे निर्देश मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिले आहे.

परिवहन विभाग यांनी पत्र क्र.जा.क्र/088/2025,दि.15.05.2025 अन्वये नागपूर शहर बस सेवेत मनपा शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना 100 टक्के मोफत पास सवलत देण्याकरिता येणाऱ्या खर्चाची माहिती पुढीलप्रमाणे दिलेली आहे,

| वर्ष | पास धाकांची संख्या | देय रक्कम (टक्के 100) |
|---|---|---|
| 2024-2025 | 1353 | 1,24,18,560/- |

परिवहन विभाग यांनी वरीलप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार सन 2024-2025 या वर्षातील प्रतिपूर्ती रक्कम रु.1,24,18,560/- (अक्षरी- एक कोटी चोविस लक्ष अठरा हजार पाचशे साठ रुपये) सन 2025-2026 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार महिला व बाल विकास पद क्र.A47002473803 मधून करण्याच्या प्रश्न विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

**टिप**:- 1) महिला व बाल कल्याण आराखड्याची इतिवृत्त
2) सविस्तर माहिती नस्तीत संलग्न

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 28/**मनपा**/**प्रशासक** **दिनांक** :- 26/06/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२

अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरबस सेवेत विविध प्रकारच्या सवलती देण्यात येतात. जसे-विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, दिव्यांग, दुर्धर आजार व मनपा शाळेतील विद्यार्थी इत्यादी परिवहन विभागास सवलतीच्या रकमेची पूर्तता होत नसल्याने परिवहन विभागास दरवर्षी मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

दरवर्षी नागपूर शहरबस सेवेत मनपा शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागातर्फे विविध शालेय कार्यक्रम, सहल, क्रिडा स्पर्धा व शासनाचे सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी करिता मुलांना ने-आण करण्याकरिता 100 टक्के मोफत पास सवलत देण्यात येते. परिवहन विभागास दरवर्षी मोठ्या प्रमाणात येणाऱ्या आर्थिक भुर्दंड कमी करण्याच्या दृष्टीकोनातून मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे अध्यक्षतेखाली सन 2025-2026 या आर्थिक वर्षाकरिता महिला व बाल कल्याण योजनेच्या आराखड्याची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना मनपा शहरबस वाहतुकमध्ये नि:शुल्क प्रवास उपलब्ध करुन देण्याकरिता परिवहन विभागास प्रतिपूर्ती सन 2024-2025 मध्ये आलेला खर्च सन 2025-2026 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार महिला व बाल कल्याण पदांतर्गत करण्याकरिता मान्यता प्रदान केली आहे व सन 2025-2026 या आर्थिक वर्षातील प्रतिपूर्ती करावयाची रक्कम आर्थिक वर्षाच्या शेवटी निश्‍चित होईल त्यामुळे त्यासंदर्भात रक्कम वर्ग करण्यास पुढील आर्थिक वर्षात स्वतंत्र ठराव करण्याचे निर्देश मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिले आहे.

परिवहन विभाग यांनी पत्र क्र.जा.क्र/088/2025,दि.15.05.2025 अन्वये नागपूर शहर बस सेवेत मनपा शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना 100 टक्के मोफत पास सवलत देण्याकरिता येणाऱ्या खर्चाची माहिती पुढीलप्रमाणे दिलेली आहे,

| **वर्ष** | **पास धाकांची संख्या** | **देय रक्कम (टक्के 100)** |
|---|---|---|
| 2024 2025- | 1353 | 1-/560,18,24, |

परिवहन विभाग यांनी वरीलप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार सन 2024-2025 या वर्षातील प्रतिपूर्ती रक्कम रु.1,24,18,560/- (अक्षरी- एक कोटी चोविस लक्ष अठरा हजार पाचशे साठ रुपये) सन 2025-2026 या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार महिला व बाल विकास पद क्र.A47002473803 मधून करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.